<u>**नियमीत दिवाणी दावा क्र.१/२०१८**</u>

साहेबराव रामचंद्र गायके...

वि...

उत्तम आसाराम गायके व इतर...

<u>**निशाणी क्र.५ वरील आदेश**</u>

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ३९ रुल १ व २ प्रमाणे प्रतिवादी क्र.३ ने प्रतिवादी क्र.१ यास वीज कनेक्शन या दाव्याचा निकाल होईपावेतो देवु नये तसेच, प्रतिवादी क्र.२ ने प्रतिवादी क्र.१ यास ना हरकत दाखला देवु नये, याकरीता मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादीतर्फे ॲड.श्री. रणवरे यांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र.१ ने खोटी माहिती देवुन दावा कलम–१ मध्ये वर्णन केलेली मिळकत ग्रामपंचायत मिळकत क्र.९५ क्षेत्रफळ २३ x १७ चौरस फुट, चौदा पत्रे भेंडा मातीत बांधलेले असुन सदरची मिळकत रस्तेसुरेगांव, ता.येवला, जि.नाशिक शिवारातील गट क्र.९ मध्ये आहे. सदर मिळकत गट क्र.९ मध्ये वादीचे वडील रामचंद्र गायके यांनी प्रतिवादी क्र.१ चे मयत वडील आसाराम गायके व लक्ष्मण गायके यांचेपासुन दि.३०/०६/१९७७ रोजी फरोक्त घेतले असुन आजतागायत वादींचा मालकी कब्जा व वहिती आहे. वादीचे अशिक्षीतपणाचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी क्र.२ ग्रामसेवक यांच्याकडे खोटी माहिती देवुन प्रतिवादी क्र.१ ने घर क्र.९५ चा उतारा मिळविला व त्या आधारावर प्रतिवादी क्र.३ कडुन विज कनेक्शन घेण्याच्या विचारात आहे. अशा परिस्थीतीत खोट्या कागदपत्रांच्या आधारे प्रतिवादी क्र.३ ने प्रतिवादी क्र.१ यास विज कनेक्शन दिले तर वादीचे मोठे नुकसान होईल तसेच, प्रतिवादी क्र.२ ने सदर विज कनेक्शन घेण्यास ना–हरकत दाखल देवु नये अशी विनंती केली आहे. ॲड.रणवरे यांनी पुढे युक्तीवाद केला की, वादीस प्रथम दर्शनी केस असुन तराजुचे झुकते माप वादीचे बाजुने असुन जर वादीचा अर्ज नामंजुर केला तर वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल त्यामुळे, वादीचा अर्ज मंजुर करुन प्रतिवादीविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम द्यावा अशी विनंती केली.

३. प्रतिवादी क्र.१ तर्फे ॲड.श्री. चव्हाण यांनी निशाणी १५ अन्वये दाव्यास कैफियत व तुर्तातुर्त मनाई हुकूमाचे अर्जास म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादीने वादींचे दाव्यातील सर्व प्रतिकुल कथने नाकारलेली आहेत. ॲड.चव्हाण यांनी वादीचा अर्ज हा खोडसळपणाचा असल्याचे सांगितले. वादी यास कोणतीही प्रथमदर्शनी केस नसताना वादीने खोट्या मजकुराचा अर्ज दाखल केला आहे. ॲड.चव्हाण यांनी वादीच्या तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या अर्जावरील परिच्छेद क्र.२ वर लक्ष वेधले. सदर परिच्छेद क्र.२ अन्वये वादीने विनंती केली आहे की, प्रतिवादी क्र.३ ने वादीस विज कनेक्शन या दाव्याचा निकाल होईपावेतो देवु नये तसेच, प्रतिवादी क्र.२ ने वादीस ना–हरकत दाखला देवु नये व मिळकत क्र.९५ चा उतारा रद्द करण्याचा आदेश व्हावा अशी मागणी केली आहे. यावरुन, वादी हा सदर दाव्यात गंभीर नाही. ॲड.चव्हाण यांनी पुढे युक्तीवाद केला की, अन्नवस्त्र निवारा या माणसाच्या मुलभूत गरजा असुन त्यापासुन कोणालाही वंचीत ठेवता येणार नाही. वादीची दाव्यातील मागणी बघता वादीने प्रतिवादी क्र.१ ने खोटे कागदपत्र देवुन प्रतिवादी क्र.२ कडुन ग्रामपंचायत घर क्र. ९५ चा खोटा उतारा मिळविला हे जाहीर करुन मिळावे याकरीता व प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी ना–हरकत दाखला देवु नये याकरीता दाखल केला आहे. अशा परिस्थीतीत घर क्र.९५ हा गट क्र.९ मध्ये असल्याचे प्रथमदर्शनी वादीने शाबीत करणे आवश्यक आहे. परंतु, प्रस्तुत दाव्यामध्ये वादी हा प्रतिवादी क्र.१ यास विज कनेक्शन मिळु नये याकरीता प्रयत्न करत आहे, हे चुकीचे आहे. त्यामुळे, वादीस कोणतीही प्रथमदर्शनी केस नसुन जर वादीचा अर्ज मंजुर केला तर, प्रतिवादी क्र.१ यास अंधारात जिवन व्यतीत करावे लागेल. यामुळे, वादीने केलेली मागणी ही कायदेशीर नाही. त्यामुळे, वादीचा अर्ज रद्द करावा अशी विनंती केली.

४. प्रतिवादी क्र.२ व ३ यांना हे दाव्यात हजर झाले नाही व त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही त्यामुळे, त्यांचेविरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचा हुकूम निशाणी क्र.१ वर पारीत करण्यात आला.

५. दोन्ही पक्षांची कथने व अभिलेखावर असलेल्या पुराव्यांचे बारकाईने अवलोकन करता तसेच, युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझे विचारार्थ उद्भवतात, त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहेत–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी हे शाबीत करु शकले काय की, त्यांच्या बाजुने सकृतदर्शनी केस आहे ? | ...नकारार्थी |
| २ | वादी हे शाबीत करु शकले काय की, अनुकुलतेचे झुकते माप त्यांच्या बाजुने आहे ? | ...नकारार्थी |
| ३ | वादी हे शाबीत करु शकले काय की, अर्ज नामंजुर झाल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल ? | ...नकारार्थी |
| ४ | आदेश काय | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ करीता ः-**

६. वरील सर्व मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे कारणमिमांसेकरीता विश्लेषणासाठी एकत्रीतपणे घेतले आहेत.

७. वादीतर्फे ॲड.रणवरे यांनी तुर्तातुर्त मनाई अर्जातील परिच्छेद क्र.२ मध्ये झालेली चुक ही टायपिंग चुक असल्यामुळे वादींची संपुर्ण कथने ही प्रतिवादी क्र.३ ने प्रतिवादी क्र.१ यास विज कनेक्शन देवु नये व प्रतिवादी क.२ ने त्यास ना-हरकत दाखला करीता मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे. याउलट, प्रतिवादी क्र.३ तर्फे ॲड.चव्हाण यांनी युक्तीवाद केला की, वादीने सदर घर क्र.९५ हा गट क्र.९ मध्ये असल्याचे प्रथमदर्शनी अभिलेखावर आणले नाही तसेच, वादीचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीचे न भरुन येणारे नुकसान होईल. त्यामुळे, वादीचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

८. दोन्ही पक्षांचे युक्तीवाद ऐकल्यानंतर व अभिलेखावर असलेल्या कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन करता, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र.१ ने घर क्र.९५ चा उतारा खोटो कागदपत्र देवुन मिळविला आहे, हे जाहीर करुन मिळण्याकरीता दाखल केला आहे. सदर बाब ही दोन्ही पक्षांचे पुरावे व युक्तीवाद झाल्यानंतर अंतीम निकालात स्पष्ट होईल. सद्य परिस्थीतीत वादीने प्रतिवादी क्र.३ याने प्रतिवादी क्र.१ यास विज कनेक्शन देवु नये या करीता तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज दिलेला आहे. जर प्रतिवादी क्र.३ याने प्रतिवादी क्र.१ यास विज कनेक्शन दिले तर वादीचे कोणते नुकसान होईल याविषयी वादीने कथन केले नाही. तसेच, वादीचे दाव्यातील कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ हा सुमारे एक वर्षापासुन बेकायदेशीरपणे घर क्र.९५ मध्ये राहत असुन त्यास घर क्र.९५ मध्ये राहण्याचा अधिकार नाही. अशा परिस्थीतीत प्रतिवादी क्र.१ हा घर क्र.९५ मध्ये राहत असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे, वादीच्या तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या अर्जातील मागण्या योग्य व कायदेशीर वाटत नाहीत. वादीस प्रथमदर्शनी केस आहे याबाबत वादीने अभिलेखावर प्रथमदर्शनी कोणताही पुरावा दिलेला नाही. वादीचा सदर अर्ज नामंजुर केल्यास कोणते नुकसान होईल ही बाब प्रथमदर्शनी अभिलेखावर आणली नाही. त्यामुळे, प्रथमदर्शनी न्यायाचे तराजुचे झुकते माप वादीकडे दिसुन येत नसल्यामुळे, वरील मुद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे व पुढील आदेश पारीत करत आहे.

## – आ दे श –

१) वादीचा अर्ज रद्द करण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

**(एन.एन. चिंतामणी)**

**दि.२७/०४/२०१८** **सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

**येवला, जि.नाशिक.**